ePaper

## पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील: अमित शाह



| वर्ष - 7 | अंक -29 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- पुण्यात भाजपने भाकरी फिरवली!
- पुण्यात 'एक दिवस डोक्यासाठी' सुरु
- प्रशासकीय राजवटीत देखील ठेकेदारांसाठी पायघड्या!

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 25 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवडचा 12 वीचा निकाल 94 टक्के!

» सोशल मीडियावर जल्लोष, यंदा 97.77 टक्के मुलांनी मारली बाजी

» गतवर्षीच्या तुलनेत यंदा 0.2 टक्क्यांनी निकालात घट

## » निकाल पाहताच विद्यार्थ्यांनी सुरू केला जल्लोष, एकमेकांना शुभेच्छा देत यशस्वी विद्यार्थ्यांनी आपले यश केले 'सेलिब्रेट'

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहराचा बारावीचा निकाल ९४. ४४ टक्के लागला. गेल्या वर्षीच्या तुलनेत ०.२ टक्क्यांनी निकाल घटला आहे. यंदा ९७. ७७ टक्के मुलांनी बाजी मारली आहे. बारावीचा निकाल गुरुवारी (ता. २५) ऑनलाइन जाहीर झाला निकाल पाहताच विद्यार्थ्यांनी जल्लोष सुरू केला. एकमेकांना शुभेच्छा देत यशस्वी विद्यार्थ्यांनी आपले यश मित्र-मैत्रिणींबरोबर 'सेलिब्रेट' केले. कोणी पेढे वाटून, तर कोणी एकमेकांना हस्तांदोलन करून यशाच्या शुभेच्छा दिल्या. हसरे चेहरे आणि आनंदी चेहऱ्यांनी महाविद्यालयाचा परिसर फुलून गेला होता.**



पिंपरी - पिंपरी चिंचवडचा ९४.४४ टक्के निकाल लागला असून, गतवर्षी ९४. ६४ टक्के निकाल होता. त्या तुलनेत ०.२ टक्क्यांनी निकालात घट झाली आहे. यंदा २३ शाळांनी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली, तर दुसरीकडे भूमकर चौकातील आर्ट, कॉमर्स आणि सायन्स ज्युनिअर कॉलेजने सर्वाधिक कमी ७७.७७ टक्के मिळविले आहेत. शहरातून १८ हजार ७६ विद्यार्थांनी नोंदणी केली होती. नऊ हजार ६०० मुले, तर ८ हजार ४७६ अशी संख्या होती.

९ हजार ५३८ मुले, तर ८ हजार ४३७ असे एकूण १७ हजार ९७५ विद्यार्थांनी परीक्षा दिली. त्यापैकी ८ हजार ८४९ मुले आणि ८ हजार १२७ मुली असे मिळून १६ हजार ९७६ परीक्षार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यात ९७.७७ टक्के मुलांनी बाजी मारली आहे. ९६.३२ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

### चिंतामणी रात्रप्रशालेच्या निकालात घट

» चिंचवडमधील चिंतामणी रात्रप्रशालेच्या निकालात कमालीची घट झाली आहे. गेल्यावर्षी ९०.४७ टक्के मिळविले होते. यावर्षी ६२.५० टक्के प्राप्त केले आहे.

### शिक्षक संपाचा परिणाम नाही

» राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारीमध्ये बारावी परीक्षा घेण्यात आली होती. गेल्यावर्षी ८ जून रोजी बारावीचा निकाल जाहीर केला जातो. जुनी पेन्शन लागू करण्यासाठी अनेक शिक्षक संपावर गेले होते. पण त्याचा कुठलाही परिणाम उत्तरपत्रिका तपासणी झाला नसल्याचे निकालावरून दिसून येत आहे.

### सोशल मिडियावर जल्लोष

» बारावी उत्तीर्ण झाल्याचा आनंद व्यक्त करत काहींनी आपला सेल्फीही फेसबुकवर अपलोड केला, तर काहींनी व्हॉट्सअॅपवरून आप्तेष्ट आणि मित्र-मैत्रिणींना बारावीच्या निकालाची आनंदवार्ता दिली. सुटीसाठी गावी गेलेल्या मित्र-मैत्रिणींनी बारावीच्या निकालाची वार्ता फेसबुक, व्हॉट्सऍप, हाईक आणि इंस्टाग्रामवरून आपल्या मित्र-मैत्रिणींना कळवली. काहींनी पेढे वाटताना, हस्तांदोलन करताना आणि शुभेच्छा घेतानाचे छायाचित्र पोस्ट करत बारावीच्या परीक्षेत यश मिळवल्याचा आनंद साजरा केला. लोणावळा केंद्राचा बारावीचा निकाल ८८.९४ टक्के लागला आहे. बारावीच्या परीक्षेत लोणावळा विभागात यंदा कला, वाणिज्य आणि विज्ञान या तिन्ही शाखा मिळून नवीन १ हजार २८४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. यापैकी १ हजार १४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.

# पुण्यात भाजपने भाकरी फिरवली!

## खंद्या पदाधिकाऱ्यांवर पुणे शहर आणि पिंपरी चिंचवडची जबाबदारी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपला पराभवाचा झटका बसला. त्यानंतर मार्चमध्ये भाजपचे खासदार गिरीश बापट यांचे निधन झाले. यामुळे पुण्यावरील भाजपची पकड कुठेतरी सैल होताना दिसून आली. या पार्श्वभूमीवर भाजपने जोरदार तयारी सुरू केली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार पुणे शहर प्रभारी म्हणून अमर साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर पिंपरी चिंचवड शहराच्या प्रभारी म्हणून वर्षा डहाळे यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे.**



काही दिवसांपूर्वी नियुक्ती देण्यात आलेले राजे पांडे यांना आता पुणे ग्रामीण आणि मावळचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे भाजपने पुणे जिल्ह्यासाठी भाकरी फिरवण्यास सुरुवात केली आहे.

राज्यात भाजपची ताकत वाढावी यासाठी बावनकुळे यांच्याकडून विभाग आणि जिल्हा प्रभातीच्या नियुक्त्या आज करण्यात आल्या आहेत. यात १६ उपाध्यक्ष, ६ सरचिटणीस, १५ चिटणीस यासह कोषाध्यक्ष, संघटन मंत्री यांचा समावेश आहे. त्यामुळे प्रत्येकाकडे प्रत्येक मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे.भाजपकडून आता नवीन दोन विभाग करण्यात येणार आहेत. त्यात उत्तर पुणे जिल्हा आणि दक्षिण पुणे जिल्हा असे विभाग करण्यात येणार आहेत. त्यासाठी दोन जिल्हाध्यक्ष देखील निवडले जाणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

भाजपने आपली ताकत वाढवण्यासाठी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यास सुरुवात केली आहे. याचा भाजपला किती फायदा होतो? हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

### भाजपने भाकरी फिरवली

» आंबेगाव, जुन्नर, खेड, शिरूर, हवेली, मावळ या तालुक्यांचा उत्तर पुणे जिल्ह्यात समावेश होतो. तर मुळशी, भोर, वेल्हे, पुरंदर, दौंड, बारामती आणि इंदापूर हे तालुके दक्षिण विभागात येतात.
निवडणुकीच्या पार्श्भूमीवर भाजपने आपली पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यात बारामती, शिरूर आणि मावळ या मतदारसंघांवर भाजपकडून विशेष लक्ष दिले जाणार आहे.

## पुण्यात अग्नितांडव!
## भवानी पेठेतील लाकडांच्या वखारी भस्मसात



। पुणे । महाईन्यूज ।

पुण्यातील भवानी पेठ परिसरात असणाऱ्या लाकडाच्या वखारीला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. गुरुवारी पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास भवानी पेठ येथील टिंबर मार्केटमधील रामोशी गेटजवळ लाकडांच्या गोडाऊनला भीषण आग लागली. या आगीत सात ते आठ लाकडांच्या वखारी जळून खाक झाल्या आहेत. ही आग इतकी भीषण होती की लांबच्या अंतरावरुन धुराचे आणि आगीचे प्रचंड लोट दिसत होते. आगीची वर्दी मिळाल्यानंतर अग्शिशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामन दलाच्या ३० गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून २० अधिकाऱ्यांसह १०० जवान आग विझवण्याचे काम करत आहेत.

अग्निशामक दलाच्या जवानांनी प्रथमत: आग वस्तीमधे व शेजारील शाळेमध्ये पसरु न दिल्याने व सुमारे १० सिलेंडर बाहेर काढल्याने मोठा धोका टळला. सकाळी आठ वाजेपर्यंत अग्निशमन दलाकडून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मुख्य अग्निशमन अधिकारी देवेंद्र पोटफोडे यांच्यासमवेत इतर २० अधिकारी व जवळपास १०० जवान आणि पुणे मनपा- पुणे कॅन्टोमेंट-पीएमआरडीए-पिंपरी चिंचवड अग्निशमन दल अशी एकुण जवळपास ३० अग्निशमन वाहने व खाजगी वॉटर टँकर दाखल आहेत. ही आग कोणत्या कारणाने लागली हे अद्याप समजू शकलेले नाही. आगीत अद्याप जीवितहानी झालेली नसलेली तरीही या आगीत लाखोंचं नुकसान झालेले आहे.

# पुण्यात 'एक दिवस डोक्यासाठी' सुरु

## हेल्मेट दिनाच्या दिवशी दुचाकीस्वारांकडून लाखोंचा दंड

।पुणे । महाईन्यूज

**वाहतूक पोलिसांकडून हेल्मेट घालून नियम पाळणाऱ्या नागरिकांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. हेल्मेट न घालणाऱ्यांवर दंडात्मक कारकाई करण्यात आली. वाहतूक पोलिसांनी एकूण १६२६ जणांवर कारवाई केली.**





‘एक दिवस डोक्यासाठी’ या मोहिमेअंतर्गत शहरात पाळण्यात आलेल्या हेल्मेट दिनाच्या निमित्ताने विनाहेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या २२४८ दुचाकीस्वारांवर वाहतूक पोलिस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या पथकाने कारवाईचा बडगा उगारला. त्यांना ११ लाख २४ हजार रुपयांचा दंड बजावण्यात आला आहे.

शहरातील सर्व सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना हेल्मेट घालण्याच्या सूचना ‘पुणे प्रादेशिक परिवहन विभागा’ने (आरटीओ) पूर्वीच दिल्या आहेत. जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीतही जागतिक रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने ‘एक दिवस डोक्यासाठी’ मोहिमेअंतर्गत शहरातील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना एक दिवस हेल्मेटसक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. जिल्हाधिकारी कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, आरटीओ यासह विविध राज्य सरकारी कार्यालयांच्या प्रवेशद्वारावर हेल्मेट कारवाई करण्यात आली. ‘हेल्मेट दिनाच्या दिवशी शहरात हेल्मेट कारवाई केली जाणार आहे,’ असा मेसेज समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला होता. त्यामुळे बुधवारी सकाळपासून नागरिकांमध्ये हेल्मेट कारवाईचीच चर्चा होती.

वाढते रस्ते अपघात आणि हेल्मेटअभावी होणाऱ्या मृत्यूंची संख्या विचारात घेता शहरात बुधवारी लाक्षणिक हेल्मेट दिन पाळण्यात आला. त्यास संमिश्र प्रतिसाद मिळाला.

### आरटीओच्या पथकाची 622 जणांवर कारवाई

» हेल्मेट दिनाच्या निमित्ताने वाहतूक पोलिसांच्या बरोबरीने आरटीओचे अधिकारी-कर्मचारी देखील कारवाईसाठी रस्त्यावर उतरले होते. आरटीओचे चार सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, ४४ सहायक मोटार वाहन निरीक्षक, २५ मोटार वाहन निरीक्षक असे एकूण ७३ अधिकारी कारवाईसाठी विविध कार्यालयांच्या प्रवेशद्वारावर दाखल झाले होते.

### दोन दिवस कारवाई

» सरकारी कार्यालयांमध्ये विनाहेल्मेट येणाऱ्या दुचाकीस्वारांवर आणखी दोन दिवस कारवाई केली जाणार आहे. वाहतूक पोलिसांकडून चौकांमध्येही काही प्रमाणात दुचाकीस्वारांवर कारवाई केली जात आहे. या दरम्यान, दुचाकीस्वारांचे प्रबोधनही करण्यात येणार आहे.

**1626 :** वाहतूक पोलिसांनी कारवाई केलेले वाहनचालक

**622 :** आरटीओच्या पथकाने कारवाई केलेले

**2248 :** दिवसभरात कारवाई करण्यात आलेले एकूण वाहनचालक

# प्रशासकीय राजवटीत देखील ठेकेदारांसाठी पायघड्या!

## वाढीव दरांच्या निविदेनांही मान्यता, प्रशासकीय राजवटीमध्ये उधळपट्टी सुरू

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी (दि. २५ मे २०२३) :- पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने डुडुळगाव येथे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत १ हजार १९० घरे बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी १४२ कोटी ५७ लाखांची निविदा काढण्यात आली होती. मात्र, ठेकेदाराने सादर केलेल्या दरापेक्षा वाढीव दराने निविदेला मान्यता देत प्रशासकीय राजवटीमध्ये उधळपट्टी सुरू आहे.**



निविदा दरापेक्षा तब्बल २५ कोटी रुपये जास्त खर्च होत असतानाही संबंधित ठेकेदाराला प्रशासकांनी पायघड्या टाकत काम देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या कामामध्ये तब्बल २५ कोटी रुपये वाढीव खर्च होणार आहे. शहरामध्ये च-होली व बो-हाडेवाडी येथे पंतप्रधान आवास योजनेच्या घरांचे काम सुरू आहे. रावेत येथील जागेचा वाद न्यायालयात असल्याने हे काम थांबलेले आहे. तर त्यानंतर आता डुडुळगाव येथील योजनेसाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली. डुडुळगाव येथील आरक्षण क्रमांक १/२३३, प्लॉट नंबर १०५ (पी). १०७ (पी). १०८ (पी), ११२ (पी) मध्ये आवास योजनेचा प्रकल्प होत आहे. या प्रकल्पात १ हजार १९० घरांसाठी एकूण १४२ कोटी ५७ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली. या निविदेत शांती कन्स्ट्रक्शन (गुजरात) यांनी १७३ कोटी ५८ लाख आणि यशोनंद इंजिनिअरिंग कंपनी यांनी १७६ कोटी रुपयांची निविदा भरली होती. यामध्ये शांती कन्स्ट्रक्शन या ठेकेदारी कंपनीने दर कमी करून १६७ कोटी ५० लाख ९८ हजार ८७० रुपये नवीन दर सादर केला.

> मागील वर्षी या कामासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. चालू बाजारभावापेक्षा जादा दराची निविदा प्राप्त झाली. त्यामध्ये निविदा स्वीकृत योग्य दराच्या तुलनेत ३.४३ टक्के ज्यादा दराने काम देण्यात येत आहे. सिमेंट, स्टील, कर्मचारी यांचे भाव वाढले आहे. त्यानुसार, वाजवी दर आहेत.
>
> – **रामदास तांबे,** सहशहर अभियंता, पिपरी-चिंचवड महापालिका

### प्रशासक शेखर सिंह यांनी दिली मान्यता

» या निविदेत दोनच ठेकेदारांच्या निविदा पात्र झाल्या. त्यामध्ये काम देण्यात आलेल्या ठेकेदारी कंपनीचा दरदेखील निविदा दरापेक्षा १७.४४ टक्के अधिक असून तब्बल २४ कोटी ९८ लाख रुपये जास्तीचा खर्च होणार आहे, तर महापालिकेने स्वीकृत योग्य दर १६२ कोटी २५ लाख २४ हजार १६३ इतका गृहीत धरला आहे. या स्वीकृत योग्य दरापेक्षाही ३.४३ टक्के ज्यादा दराने हे काम देण्यास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. त्यानुसार १६७ कोटी ८२ लाख ७५ हजार ८३६ रुपये इतका खर्च आहे.

# "उपयोगकर्ता कर" म्हणजे "जिझिया कराची" पुनरावृत्ती

## महापालिकेने "उपयोगकर्ता कर" मागे न घेतल्यास राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा आंदोलनचा इशारा

### युवक शहराध्यक्ष इम्रान शेख उपआयुक्त जितेंद्र वाघ यांना निवेदन

। भोसरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कचरा संकलनाच्या नावाखाली शहरातील जनतेवर लावलेला उपयोगकर्ता शुल्क रद्द करणेबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे वतीने महापालिका उपआयुक्त जितेंद्र वाघ यांना निवेदन देण्यात आले.**



यावेळी बोलताना युवक अध्यक्ष इम्रान शेख म्हणाले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कचरा संकलनाच्या नावाखाली शहरातील नागरिकां कडून स्वच्छता कर आकारला जात असताना देखील "उपयोगकर्ता शुल्क" या नावाने मिळकतकराच्या बिलात महिन्याला ६० रुपये प्रमाणे वर्षाला ७२० रुपये वाढ केली आहे. आणि मागील दोन वर्षाची थकबाकी म्हणून १२६० रुपये महापालिकेकडून वसूल करीत आहे. हे अन्यायकारक असून हा निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा. मुळातच सदर प्रकारचा उपयोगकर्ता शुल्क महाराष्ट्रातील कोणतीही महानगरपालिका घेत नाही मग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस अशा प्रकारचा उपयोगकर्ता शुल्क घेण्याची एवढी घाई का..?

शहरातील नागरिक कर स्वरूपात लाखो रुपये कर महानगरपालिकेस भरतात, त्या मोबदल्यात महापालिकेने शहरातील नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा पुरवायचे असतात. याउलट त्या सुविधांना महापालिका उत्पन्नाचे साधन म्हणून पहात आहे आणि प्रशासक राजवटीच्या नावाखाली मनपा विविध कर व शुल्काच्या माध्यमातून शहरातील नागरिकांची लुट करीत आहे. ही लूट म्हणजे आधुनिक "जिझिया कर" असून महापालिकेच्या एक अधिकार शाही निर्णयांना राष्ट्रवादी काँग्रेसचा तीव्र विरोध आहे. हा उपयोग कर्ता कर रद्द न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे महापालिके प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

यावेळी युवक शहराध्यक्ष इम्रान शेख,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी, प्रदीप गायकवाड, निलेश शिंदे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष ओम क्षीरसागर, विकास कांबळे,शाहीद शेख राहील मुलानी, ओमनी गायकवाड, आसिफ पटेल व युवक पदाधिकारी उपस्थित होते.

# एकाच रंगसंगतीचा गणवेश मोफत देण्याचा तुघलकी निर्णय




कोणतेही निर्णय वेळेत घ्यायचे नाहीत, घेतलेले नीट अमलात आणायचे नाहीत आणि निर्णयांची अंमलबजावणी करताना पैशाचा विचार करायचा नाही, याची सरकार नावाच्या यंत्रणेला इतकी सवय झालेली असते, की त्यापुढे इतर साऱ्या गोष्टी दुय्यम ठरतात. यंदापासून राज्यातील सर्व सरकारी शाळांमधील पहिली ते आठवीच्या मुलांना एकाच रंगसंगतीचा गणवेश मोफत देण्याचा निर्णय असाच तुघलकी आहे. राज्यातल्या ६४ लाख विद्यार्थ्यांना हा गणवेश येत्या १५ ते २० दिवसांत मिळणे शक्य तरी आहे का? राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचा अशा आततायी निर्णयांवर काहीच वचक नसावा, हे आश्चर्यकारक व धक्कादायक आहे. कोणत्याही राज्यातले गणवेश व्यावसायिक शाळा अशी तोंडावर आली असताना काम सुरू करीत नाहीत. ते चार-सहा महिने आधीच अंदाज घेऊन आपले काम सुरू करतात. शाळा त्यांच्या संपर्कात असतात. सध्या राज्य सरकार राज्यातील सर्व सरकारी; तसेच अनुदानित शाळांमधील राखीव प्रवर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोफत गणवेश, बूट व शैक्षणिक साहित्य देतेच. या नव्या निर्णयामुळे खुल्या प्रवर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनाही सरकारी खर्चाने मोफत गणवेश मिळणार आहे. यासाठीची तरतूद यंदाच्या अर्थसंकल्पात केली असेल, तर त्या वेळीच सर्व शाळांसाठी सरकारने आदेश 'निर्गमित' का केले नाहीत? मधल्या काळात शाळांनी जे गणवेश ठरविले किंवा विकत घेण्यासाठी हालचाली केल्या, त्याचे काय करायचे? राज्य सरकारने महाराष्ट्राला या प्रश्नांची उत्तरे द्यायला हवीत. ३८० कोटी रुपयांची रक्कम अशीच आयत्या वेळी निर्णयाची अंमलबजावणी



करून, सरकारला खर्चून टाकता येणार नाही.

ज्या शाळांनी वेगळ्या गणवेशांची आधीच तयारी केली असेल, त्यांची गैरसोय होऊ नये, म्हणून आता राज्य सरकारने तीन दिवस आधी ठरलेला जुना गणवेश आणि उरलेले तीन दिवस आता निश्चित केलेला निळसर रंगाचा गणवेश, असा तोडगा सुचविला आहे. असा तोडगा काढण्याऐवजी, हा समान गणवेशाचा निर्णय सरळ पुढच्या शैक्षणिक वर्षापासून लागू करायला हवा होता. त्यासाठी मग हातात वेळही राहिला असता. खासगी व्यावसायिकांचेही नुकसान टळले असते. पालकांचा गोंधळ झाला नसता आणि मुलांनाही दर आठवड्यात दोन दोन वेगळे गणवेश घालण्याची गरज पडली नसती; पण सरकारने एकदा हातात छडी घेतली, की सगळ्यांना शिक्षा देण्याचा देवदत्त अधिकार त्याला मिळतो, असे दिसते. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात यापेक्षा इतर बऱ्याच गोष्टी तातडीने करण्यासारख्या आहेत. शेकडो शाळांमध्ये पुरेसे शिक्षक नाहीत. मुला-मुलींसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी नाही. स्वच्छतागृहे नाहीत. किती तरी शाळांच्या इमारतींची डागडुजी करण्याची गरज आहे. लाखो मुलांच्या हातात पाठ्यपुस्तकांशिवाय इतर पुस्तके पडत नाहीत. जी पडतात, ती भ्रष्ट मार्गांनी सरकारच्या गळ्यात मारलेली रद्दीची चोपडी असतात. कित्येक शाळांमध्ये माध्यान्ह भोजन नीट मिळत नाही. राज्यातल्या आश्रमशाळा समाजकल्याण खात्याच्या अखत्यारीत येतात; पण तिथे शिकणाऱ्या मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या दृष्टीने खाते कोणतेही असले, तरी सरकार एकच असते. या आश्रमशाळांची काय अवस्था आहे? यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारने 'जागतिक दर्जाचे शिक्षण देणाऱ्या निवासी आश्रमशाळा राज्यात उभारून दाखवू,' अशी बढाई मारली आहे. आधी राज्यातल्या प्रत्येक आश्रमशाळेतील मुला-मुलीला किमान माणसासारखी वागणूक आणि सोयी मिळतील, याची तरी काळजी घ्या. नुसत्या सवंग घोषणांनी काय होणार? यंदापासूनच समान गणवेशाची घोषणा अशीच सवंग आहे आणि हा निर्णय अमलात आणण्याची घाई आततायी, यातील आर्थिक व्यवहारांबद्दल शंका निर्माण करणारी आहे.

या निर्णयाबाबत शिक्षक किंवा मुख्याध्यापकांनी काही बोलू नये आणि त्यांनी केवळ मुलांना शिकविण्याचे काम करावे, अशी भाषा जर कोणी वापरत असेल, तर हा अहंकार अजबच म्हणावा लागेल. मुलांच्या गणवेशाविषयी बोलण्याचा अधिकार शिक्षकांना नाही का? यात केंद्र सरकारच्या अनुदानातून होणारे गणवेश आणि राज्य सरकारच्या अनुदानातून होणारे गणवेश यांच्यात तरी एकवाक्यता आहे का? अनेक शिक्षकांच्या प्रतिक्रियांवरून तसे दिसत नाही. खासगी मान्यताप्राप्त शाळा अनुदान सरकारकडून घेतात. त्यांच्या शिक्षकांचे पगार राज्य सरकार देते. मग या शाळांमधील मुलांचा गणवेश सरकारने ठरवून तसा त्यांना दिला तर काय चुकले, हा प्रश्न वरवर योग्य वाटतो; पण तो 'आम्ही सांगू ते ऐकलेच पाहिजे,' असा गर्भित इशारा देणारा वाटतो. शाळांनी ऐकावे असे वाटत असेल, तर या निर्णयाची तयारी एक वर्ष

## संपादकीय »

### बहुलिप्ततावाद?

***पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या विविध देशांच्या दौऱ्यावर आहेत. जी-७ समूहातील राष्ट्रांच्या जपानमधील परिषदेसाठी ते विशेष निमंत्रित होते..***

आशिया-प्रशांत टापूमध्ये भारताची भूमिका आणि महत्त्व विशद करण्यासाठी पापुआ न्यू गिनीसारख्या प्रशांत महासागरीय देशांना भेटी दिल्यानंतर ते ऑस्ट्रेलियाला पोहोचतील. येत्या सप्टेंबर महिन्यात भारतात जी-२० समूहातील राष्ट्रप्रमुखांची शिखर परिषद होत आहे. त्याआधी जून महिन्यात मोदी यांचा अमेरिका दौरा नियोजित आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात, अर्थकारणात आणि व्यापारात भारताचे आणि मोदींचे महत्त्व वाढू लागल्याची ही लक्षणे खरीच. पण जी-७ परिषदेमध्ये मोदी यांनी मांडलेल्या बहुराष्ट्रवादाच्या मुद्द्याचा परामर्श घेणे यानिमित्ताने आवश्यक ठरते. जगाला सध्या ग्रासणाऱ्या अनेक समस्यांच्या मुळाशी संयुक्त राष्ट्रांचे सामूहिक अपयश असल्याचे मोदी सांगतात. हे मत त्यांनी या वर्षी मार्च महिन्यात भारतात झालेल्या जी-२० राष्ट्रसमूहातील परराष्ट्रमंत्रीस्तरीय बैठकीच्या वेळीही मांडले होते.

**जागतिक तापमानवाढीमुळे हवामानविषयक आपत्तींचा फेरा आणि तीव्रता वाढेल, असा इशारा विविध अभ्यासांतून पुढे येत असतानाच, पूर, चक्रीवादळे अशा नैसर्गिक आपत्तींमुळे भारतात २०२२ या एकाच वर्षात २५ लाख लोक देशातल्या देशातच विस्थापित झाल्याची आकडेवारी जीनिव्हास्थित 'इंटर्नल डिसप्लेसमेंट मॉनिटरिंग सेंटर'च्या अहवालात आहे.**

## संकटे आणि विस्थापन

या एकाच वर्षात दक्षिण आशियात नैसर्गिक आपत्तींमुळे एक कोटी २५ लाख लोक विस्थापित झाले. यातील ९० टक्के विस्थापन पुरामुळे झाले. सर्वच देशांना पुराचा तडाखा बसला असला, तरी भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश या देशांत पुरामुळे सर्वाधिक हानी झाली. प्रामुख्याने जून ते सप्टेंबर या नैर्ऋत्य मोसमी काळात हे विस्थापन घडून आले असले, तरी भारत आणि बांगलादेशात मान्सूनच्या अधिकृत आगमनापूर्वीच पुराच्या घटना घडल्या. आसाममध्ये मे महिन्यातच पुराने कहर केला. याच भागाला जूनमध्ये पुन्हा एकदा पुराचा तडाखा बसला. यात राज्यातील ५० लाख लोक बाधित झाले. मे महिन्यात भारतात झालेल्या अतिवृष्टीने बांगलादेशात नद्यांना पूर येऊन साडेपाच हजार लोक विस्थापित झाले.

चक्रीवादळांचा विचार करता, दक्षिण आशियात २०२२मध्ये ११ लाख लोक अंतर्गत विस्थापित झाले. ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये धुमाकूळ घातलेल्या 'सितरंग' वादळामुळे ६६ हजार, तर तमिळनाडूला तडाखा देणाऱ्या 'मोंडूस' वादळामुळे साडेनऊ हजार लोक बेघर झाले. या अहवालात लहान आपत्तींमुळे झालेली हानी समाविष्ट केली नसल्याने, प्रत्यक्ष विस्थापनाचा आकडा याहून मोठा असू शकतो. सन २०२१मध्ये हा आकडा एक



हजार ७५०, तर २०२०मध्ये एक हजार ३३८ होता. ही वाढ पाहता, हवामानाच्या आपत्तींकडे गांभीर्याने पाहण्याची गरज लक्षात येते. जागतिक तापमानवाढीमुळे हवामानविषयक आपत्तींचा फेरा आणि तीव्रता वाढेल, असा इशारा विविध अभ्यासांतून पुढे येत असतानाच, पूर, चक्रीवादळे अशा नैसर्गिक आपत्तींमुळे भारतात २०२२ या एकाच वर्षात २५ लाख लोक देशातल्या देशातच विस्थापित झाल्याची आकडेवारी जीनिव्हास्थित 'इंटर्नल डिसप्लेसमेंट मॉनिटरिंग सेंटर'च्या अहवालात आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।  
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥  
नव्हे आराणुक लौकिकापासून ।  
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# लोकशाही काय चाटायची आहे?

## नव्या संसदेच्या उद्घाटनावरुन ठाकरे गटाची मोदी सरकारवर टीका

### सामनाच्या अग्रलेखातून मोदी सरकारवर घणाघाती टीका

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नव्या संसदेच्या उद्घाटनाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण देण्यात आलेलं नाही. या मुद्द्यावरुन काँग्रेससह २० विरोधी पक्षांनी २८ मे रोजी होणाऱ्या नव्या संसद भवनाच्या उद्घाटन सोहळ्यावर बहिष्कार घातला आहे. या मुद्द्यावरुन मोदी सरकारवर दररोज टीका केली जाते आहे. ठाकरे गटाने सामनाच्या अग्रलेखातूनही आज मोदींना खडे बोल सुनावले आहेत. जर विरोधकांच्या भूमिकेला महत्त्वच नसेल तर लोकशाही काय चाटायची आहे का? असा सवालही सामनातून करण्यात आला आहे. तसंच राष्ट्रपतींना निमंत्रण दिलेलं नाही किमान आडवाणींसाठी तरी एक कोपरा आहे का? असा खोचक प्रश्नही विचारण्यात आला आहे.**



भारतीय जनता पक्ष लोकांना भ्रमित करण्यात पटाईत आहे. लोकांना पेडगावचा रस्ता दाखवायचा व वेडगावला न्यायचे असे त्याचे धोरण आहे. दिल्लीत रविवारी संसद भवनाचे उद्घाटन होत असून २० विरोधी पक्षांनी उद्घाटन सोहळ्यावर बहिष्कार घातला आहे. बहिष्काराची पर्वा न करता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फीत कापायचे ठरवले असेल तर तो त्यांचा प्रश्न. संसद भवनाच्या उद्घाटनावर २० राजकीय पक्षांनी बहिष्कार घातला यावर भाजपाचे लोक टीका करत आहेत, पण सत्य असे आहे की २० प्रमुख पक्षांचा विरोध हा संसदेच्या उद्घाटनाला नाही तर उद्घाटनाचे साधे निमंत्रणही राष्ट्रपतींना नाही हा वादाचा मुद्दा आहे. संसदेचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते होणे हे परंपरेला धरुन झाले असते. पण हे नवे संसद भवन मी बांधले, ही माझी इस्टेट आहे, उद्घाटनाच्या कोनशिलेवर फक्त माझेच नाव राहिल मी आणि फक्त मीच असे मोदींचे धोरण आहे.

नवे संसद भवन हे भारतीय संस्कृती आणि परंपरांशी आधुनिकतेची नाळ जोडणारी इमारत असून समृद्ध लोकशाहीचे प्रतीक असल्याचे गृहमंत्री अमित शाह यांननी म्हटले. लोकशाहीवर या मंडळींनी बोलणे हा एक विनोद आहे. नवे संसद भवन हे काही एखाद्या पक्षाच्या मालकीचे नाही. नटवरलाल नावाच्या एका भामट्याने संसद, राष्ट्रपती भवन, ताजमहाल, इंडिया गेट बनावट कागदपत्रांद्वारे विकल्याची दंतकथा प्रसिद्ध आहे तसे हे नवे संसद भवन बनावट कागदपत्रांद्वारे कुणी मालकीचे करुन घेतले की काय? असाही प्रश्न सामनाच्या अग्रलेखात विचारण्यात आला आहे.

उद्घाटन सोहळ्याचे साधे निमंत्रणही राष्ट्रपतींना नाही हे विरोधी पक्षांनी बोलून दाखवल्यानंतर महाराष्ट्रातील भाजपा भजनी मंडळातल्या काही लोकांना कंठ फुटला आहे. उद्धव ठाकरेंना बोलवतेच कोण असे सवाल देवेंद्र फडणवीस वगैरेंनी विचारले. ही त्यांची टाळकुटी संस्कृती आहे. ज्या आडवाणींमुळे भाजपाला अच्छे दिन पाहायला मिळाले आहेत त्यांना तरी नव्या संसदेच्या उद्घाटनाला बोलावले आहे का? की त्यांनाही गेटवरच अडवले जाणार आहे? मुळात देशाच्या राष्ट्रपतींनाच निमंत्रण नाही तिथे तुम्हाला-आम्हाला निमंत्रण असले काय किंवा नसले काय.

### कुणालाही आग्रहाचे, प्रेमाचे निमंत्रण नाही

**लोकशाहीत विरोधी पक्षांच्या भूमिकेला महत्त्व नसेल तर ती लोकशाही काय चाटायची आहे का? राष्ट्रपती हे देशाचे प्रमुख आणि देशाचे पहिले नागरिक असल्याने त्यांचा अपमान होऊ नये. नव्या संसद भवनाच्या उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रण सर्व राजकीय पक्षांना देण्यात आलं आहे. हे पक्ष आपल्या मतांनुसार निर्णय घेतील असं अमित शाह यांनी जाहीर केले. याचा अर्थ कुणालाही आग्रहाचे, प्रेमाचे निमंत्रण नाही. अशीही टीका सामनातून करण्यात आली आहे.**

---

## करोनापेक्षा भयंकर रोग येतोय? 'डिसीज एक्स' बद्दल WHO च्या इशाऱ्याने टेन्शन वाढवलं

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या तीन वर्षांमध्ये संपूर्ण जगाने करोनासारख्या साथीच्या रोगाची लाट पाहिली. या रोगापासून बचावासाठी जगभरातील सर्वच देशांमध्ये लॉकडाऊन घोषित करण्यात आले. लोकांना स्वतःचं घर सोडून कुठेही जाता येत नव्हतं. त्याचबरोबर या रोगाने लाखो लोकांचा जीव घेतला. लाखो कुटुंब रस्त्यावर आली. २०१९ पासून सुरू झालेला हा रोग आता कुठे संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. परंतु हे शक्य झालं कारण संशोधक या रोगावर लस तयार करू शकले म्हणून. परंतु तुम्हाला वाटतं का, आता सगळं सुरळीत झालं आहे. किंवा इथून पुढे कधी असा रोग येणार नाही. तुम्हाला जर वाटत असेल की, आता जगाची अशा रोगापासून सुटका झाली आहे तर तुम्ही चूक करताय.

करोनाची लाट ओसरल्यानंतर आणि यावर लस तयार झाल्यानंतर परिस्थिती सुरळीत झाली आहे असं आपल्याला वाटत असलं तरी वैज्ञानिक पुढच्या संकटामुळे चिंतेत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) प्रमुखांनी अलिकडेच केलेलं एक वक्तव्य जगाच्या चिंता वाढवणारं आहे, तसेच वैज्ञानिकांना अधिक सतर्क करणारं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अध्यक्षांनी जगाला येणाऱ्या साथरोगासाठी तयार राहण्यास सांगितलं आहे. त्यांच्या मते हा रोग करोनापेक्षा महाभयंकर आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रायोरिटी डिसीज नावाने एक रोगांची यादी आहे. यामध्ये प्राणघातक साथीच्या रोगांचा समावेश आहे. या यादीत इबोला, सार्स आणि झिका यांसारख्या आपल्याला परिचित असलेल्या रोगांची नावं आहेत. त्यात आता डिसीज एक्स हे नाव समाविष्ट करण्यात आलं आहे.

सध्या या आजाराची ओळख पटलेली नाही, म्हणून आरोग्य संघटनेनं या आजाराला एक्स असं नाव दिलं आहे.

## ७५ वर्षांनंतर झाली बहीण-भावाची भेट!

### हृदयस्पर्शी वातावरणात सर्वांनाच अश्रू अनावर

। लाहोर । महाईन्यूज । वृत्तसंस्था।

**भाऊ बहिणीच्या नात्यातील सर्वांसाठी एक भावुक करणारा क्षण होता. भाऊ-बहीण तब्बल ७५ वर्षांनी भेटली आणि बालपणीच्या आठवणी ताज्या झाल्या. भावा-बहीणीची भेट पाहून अनेकांना अश्रू अनावर झाले.**



देशाच्या फाळणीदरम्यान ७५ वर्षांपूर्वी विभक्त झालेल्या बहीण-भावाची तब्बल ७५ वर्षांनी ऐतिहासिक कर्तारपूर कॉरिडॉरमध्ये रविवारी पुनर्भेट झाली. अत्यंत हृदयस्पर्शी वातावरणात या दोघांचे कुटुंबीयही एकमेकांना भेटले. त्यावेळी सर्वांनाच अश्रू अनावर झाले होते. या दोघांच्या पुनर्भेटीमध्ये समाजमाध्यमांनी महत्त्वाची भूमिका बजावली, हे विशेष.

या भावंडांतील महेंद्र कौर या ८१ वर्षांच्या असून त्या भारतामध्ये राहतात, तर त्यांचे भाऊ ७८ वर्षीय शेख अब्दुल अझिझ पाकव्याप्त काश्मीरमध्ये वास्तव्यास आहेत. सामाज माध्यमांवरील एका पोस्टमधून त्या दोघांना एकमेकांचा शोध लागला, असे वृत्त 'डॉन' या पाकिस्तानी वृत्तपत्राने दिले आहे.

फाळणीदरम्यान सरदार भजनसिंग यांच्या कुटुंबाची ताटातूट झाली. अझिझ पाकव्याप्त काश्मीरमध्ये गेले तर बाकीचे कुटुंब भारतातच राहिले. अझिझ यांना आपण दुरावलेल्या कुटुंबाला पुन्हा नक्की भेटू, अशी दुर्दम्य आशा होती. दोघांच्या कुटुंबीयांना समाजमाध्यमावरील पोस्टवरून एकमेकांची माहिती मिळाली. हे दोघे फाळणीदरम्यान दुरावलेले बहीण-भाऊ असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर दोघांच्याही कुटुंबीयांनी एकमेकांशी संपर्क साधून कर्तारपूर कॉरिडोरमध्ये भेटण्याचा निर्णय घेतला. अनेक वर्षांनी भाऊ भेटल्यामुळे महेंद्र कौर यांना अत्यानंद झाला होता. त्यांनी त्यांच्या भावाला पुन:पुन्हा अलिंगन दिले, त्याच्या हाताचे चुंबन घेतले. यानंतर दोन्ही कुटुंबांनी दरबार साहेब गुरूद्वाराला भेट दिली आणि एकत्र भोजन केले. त्यांनी एकमेकांना या भेटीचं प्रतीक म्हणून भेटवस्तू दिल्या. कर्तारपूर प्रशासनही त्यांच्या आनंदात सहभागी झाले. त्यांनी दोन्ही कुटुंबीयांना पुष्पहार आणि मिठाई दिली.

शीख धर्माचे संस्थापक गुरु नानकदेव यांचे अंतिम विश्रामस्थान असलेले पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील गुरुद्वारा दरबार साहिब आणि भारताच्या पंजाब राज्यातील गुरुदासपूर जिल्ह्यातील डेरा बाबा नानक या गुरूद्वारांना कर्तारपूर कॉरिडोर जोडतो. चार किमी लांबीच्या या कॉरिडोरद्वारे भारतीय शीख यात्रेकरूंना दरबार साहिबला भेट देण्यासाठी व्हिसा-मुक्त प्रवेश आहे.


# सलमान खानबद्दल कंगनानं केलं मोठं वक्तव्य




मुंबई : अभिनेत्री कंगना रणौत ही बॉलिवूडमधील सर्वात चर्चेत असलेली अभिनेत्री आहे. कंगना जशी उत्तम अभिनयामुळे चर्चेत असते तशीच तिच्या बेधडक वक्तव्यामुळे देखील चर्चेत असते. कंगनानं २००६ मध्ये प्रदर्शित झालेल्या गँगस्टर सिनेमातून अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण केलं. त्या सिनेमासाठी कंगनाला फिल्मफेअरचं नवोदित अभिनेत्रीचं बक्षिस मिळालं होतं. त्यानंतर तिनं कधीच मागं वळून पाहिलं नाही. सातत्यानं तिनं उत्तमोत्तम सिनेमांत काम केलं.

आतापर्यंत कंगनानं तिच्या करीअरमध्ये 'क्वीन',' तनु वेड्स मनु', 'पंगा', 'मणिकर्णिका: द क्वीन ऑफ झांसी' यांसारख्या सिनेमात काम केलं आहे. केवळ इतकंच नाही तर कंगनाला अभिनयासाठी एकदा नाही तर तब्बल चारवेळा अभिनयासाठी राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला आहे. अभिनयाबरोबरच कंगना तिच्या बेधडक वक्तव्यासाठी देखील ओळखली जाते. कॉफी विथ करण कार्यक्रमात जाऊन कंगनानं थेट त्याच्यावरच नेपोटिझमचे आरोप केले होते. त्यावरून खूप गदारोळ उठला होता. अभिनेत्री कंगना 'बिग बॉस सीझन ७' च्या एका भागात पाहुणी म्हणून सहभागी झाली होती.

# रॉकी और रानी की प्रेम कहानी पोस्टरवर झळकली मराठमोळी अभिनेत्री




करण जोहरनं दिग्दर्शित केलेल्या रणवीर सिंग आणि आलिया भट्ट यांचा बहुचर्चित अशा रॉकी और रानी की प्रेम कहानी या सिनेमाचं पोस्टर आज प्रदर्शित झालं आहे. या सिनेमाच्या पोस्टरवर मराठमोळी अभिनेत्री झळकली आहे. 'मिट दि रंधवाज' अशी ओळख करून देणाऱ्या या सिनेमाच्या पोस्टरमध्ये रणवीर सिंग,धर्मेंद्र, जया बच्चन यांच्याबरोबरीनं ही मराठी अभिनेत्री झळकली आहे. ही अभिनेत्री म्हणजे प्रसिद्ध अभिनेत्री आणि निर्माती क्षिती जोग. या सिनेमात क्षितीनं महत्त्वाची भूमिका साकारली आहे.

रॉकी और रानी की प्रेम कहानी या सिनेमाचं पोस्टर आज प्रदर्शित झालं. हे पोस्टर प्रदर्शित झाल्यानंतर क्षितीनं तिच्या सोशल मीडियावर हे पोस्टर शेअर केलं आहे. पोस्टर शेअर करत तिनं लिहिलं आहे की, 'मोठ्या पडद्यावरील माझ्या ड्रामेबाज कुटुंबाला भेटा.. रंधवा आणि चॅटर्जी.. आणि एक भन्नाट अनुभव घेण्यासाठी सज्ज व्हा...' धर्मेंद्र, जया बच्चन यांसारख्या अनेक वर्षं रुपेरी पडद्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल स्वतःला नशीबवान समजत असल्याची प्रतिक्रिया क्षितीनं व्यक्त केली आहे. तसंच सध्या अतिशय लोकप्रिय असलेला अभिनेता रणवीर सिंग आणि अभिनेत्री आलिया भट्ट यांच्यासोबत काम करतानाही खूपच मज्जा आली असंही क्षितीनं सांगितलं होतं. त्याचबरोबर करण जोहर याच्याबरोबर काम करणं कलाकार म्हणून समृद्ध करणारं असल्याची प्रतिक्रिया देखील क्षितीनं व्यक्त केली.

# रणवीरसोबत पूजा आणि जॅकलीनची केमिस्ट्री



बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहचा आगामी 'सर्कस' चित्रपट सध्या सर्वत्र चर्चेत आहे. येत्या काही दिवसातच हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. मनोरंजनाने परिपूर्ण असलेल्या या चित्रपटाने प्रेक्षकांचे भरघोस मनोरंजन केले जाणार असल्याचं म्हटलं जात आहे. मागील काही दिवसांपूर्वीच या चित्रपटातील करंट लगा रे हे गाणं प्रदर्शित झालं होतं या गाण्यामध्ये रणवीरसोबत दीपिका देखील होती. या गाण्याला प्रेक्षकांनी भरपूर प्रेम दिलं. दरम्यान, आता 'सर्कस'मधील आणखी एक प्रदर्शित करण्यात आलं आहे. या गाण्याचं नाव 'सुन जरा' असं आहे.

'सर्कस'मधील या गाण्यामध्ये रेट्रो स्टाईल दाखवण्यात आली आहे. शिवाय या चित्रपटाची गोष्ट देखील 60 व्या दशकातील आहे. 'सुन जरा' गाणं रोमॉटिक असून हे पापोन आणि श्रेया घोसालने गायले आहे. या गाण्यामध्ये 'सुन जरा'मध्ये रणवीरचा डबल रोल दिसत असून रणवीरसोबत पूजा आणि जॅकलीनची केमिस्ट्री देखील दिसत आहे.

'सर्कस'मध्ये दिसणार जुळ्या भावांची गोष्ट

रोहित शेट्टी दिग्दर्शित सर्कस चित्रपट विल्यम शेक्सपिअरचे नाटक द कॉमेडी ऑफ एरर्स वर आधारित आहे. यामध्ये रणवीर सिंह डबल रोलमध्ये दिसणार आहे. रणवीर व्यतिरिक्त वरुण शर्मा देखील या चित्रपटात डबल रोलमध्ये दिसणार आहे.

23 डिसेंबर 2022 रोजी होणार चित्रपट प्रदर्शित

सर्कस या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि निर्मिती रोहित शेट्टीने केली असून यामध्ये रणवीर सिंह, पूजा हेगडे, जॅकलीन फर्नांडिस, वरुण शर्मा, जॉनी लीवर हे कलाकार महत्वाच्या भूमिकेत दिसतील.23 डिसेंबर 2022 रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# भूमी पेडणेकरचा ग्लॅमरस लूक



बॉलिवूड अभिनेत्री भूमी पेडणेकर नेहमीच तिच्या अनोख्या लूकमुळे चर्चेत असते. 2014 साली तिने 'दम लगा के हईशा' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं होत.त्यावेळेस तिचे 90 किलो वजन होते. मात्र त्यानंतर तिने वजन घटविले आता दिवसेंदिवस बॉल्ड आणि ग्लॅमरस लूकमध्ये दिसत आहे. नुकतंच भूमीने जबरदस्त फोटोशीट केलंय, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. हा फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलाचं व्हायरल होत असून चाहते या फोटोवर खूप प्रतिक्रिया देत आहेत.

# हेमांगी कवीला आतुरता तिसऱ्या घंटेची!



सोशल मीडियावर बिनधास्तपणे व्यक्त होणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक अभिनेत्री म्हणजे हेमांगी कवी. एखादा सामाजिक विषय असो किंवा खासगी आयुष्यामधील एखादा प्रसंग असो हेमांगी याबाबत अगदी खुलेपणाने बोलताना दिसते. सोशल मीडियावर कायमच सक्रिय असणारी ही अभिनेत्री फोटो, व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात असते. सोशल मीडियावर ती आपल्या कामाबाबतदेखील माहिती चाहत्यांपर्यंत पोहचवत असते. नुकतीच तिने आपल्या आगामी प्रोजेक्टबद्दल माहिती पोस्ट केली आहे.

हेमांगी आता आपल्याला एका नव्या रूपात दिसणार आहे. चित्रपट वेब सीरिजनंतर आता ती नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. थँक्स डियर असं नाटकाचं नाव असून मराठीतील हरहुन्नरी कलाकार निखिल रत्नपारखी याने नाटकाचे लेखन दिग्दर्शन केलं आहे. तसेच तो या नाटकात अभिनयदेखील करत आहे. तिने पोस्टमध्ये लिहलं आहे की, "सुप्रभात नाट्यदेवता आणि रसिक प्रेक्षकांना विनम्र अभिवादन करून सहर्ष सादर करत आहोत...." असा शब्दात तिने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.हेमांगीच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत तसेच मराठी कलाकारांनी तिचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या आहेत. हेमांगीने आजवर विविध प्रकारच्या भूमिका केल्या आहेत. फु बाई फुसारख्या विनोदी कार्यक्रमात तिने प्रेक्षकांना खळखळून हसवलं आहे.

# आयपीएल: फायनलचं तिकीट कुणाला?

## मुंबई की गुजरात, टीम रोहितची बलस्थानं कोणती? गुजरातचं टेन्शन यामुळं कायम

। अहमदाबाद।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल आकाश मढवालने अवघ्या पाच धावांत पाच विकेट टिपत लखनऊ सुपर जायन्ट्सची भंबेरी उडवून दिली. ज्यामुळे मुंबई इंडियन्सने आयपीएल 'एलिमिनेटर'ची लढत जिंकली. आज, शुक्रवारी आयपीएल टी-२० स्पर्धेच्या दुसऱ्या 'क्वालिफायर'मध्ये मुंबईपुढे गतविजेत्या गुजरात टायटन्सचे तगडे आव्हान असेल. जगातील सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम, नरेंद्र मोदी स्टेडियमवर ही लढत होईल.**



चेन्नईच्या एमए चिदंबरम स्टेडियमच्या खेळपट्टीचा पुरेपूर फायदा उठवत बुधवारी आकाश मढवाल मुंबईच्या विजयाचा शिल्पकार ठरला. या एका कामगिरीच्या जोरावर तो जसप्रीत बुमराह किंवा जोफ्रा आर्चर यांची पोकळी भरून काढू शकेल, असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण आकाशने आणखी चामगिरी कामगिरी करून सातत्याने मुंबईला विजय मिळवून देणे महत्त्वाचे आहे. अडखळती सुरुवात, फलंदाजांना हळूहळू गवसलेली लय आणि यामुळे मोक्याच्या सामन्यांत मिळत गेलेले सकारात्मक निकाल अशा प्रक्रियेतून मुंबई इंडियन्स पुढे आले आहेत. गेल्या वर्षी गुणतक्त्यात तळ गाठणाऱ्या मुंबईने यंदा 'एलिमिनेट'चा अडथळा पार करून दुसऱ्या 'क्वालिफायर'पर्यंत मजल मारली अन् आता त्यांना सहाव्या जेतेपदाचे स्वप्न पडू लागले आहे जेतेपद राखण्यासाठी गुजरातला आज विजय आवश्यक आहे, तरच हार्दिक आणि कंपनीला रविवारी रंगणाऱ्या अंतिम फेरीत चेन्नईशी दोन हात करता येतील. शुभमन गिल, विजय शंकर यांच्यासह कर्णधार हार्दिक पंड्याकडून फलंदाजीतील योगदानही अपेक्षित आहे. गेल्या पाच आयपीएल लढतींत त्याने अनुक्रमे ८, फलंदाजी नाही, ८, ४ आणि २५ अशा धावा केल्या आहेत. अशी कामगिरी हार्दिकच्या बिरुदाला साजेशी नाही. मोक्याच्या क्षणी फटकेबाजी करू शकेल, या दृष्टिकोनातून संघात स्थान देण्यात आलेल्या डेव्हिड मिलरला यावर्षीच्या आयपीएलमध्ये साधे अर्धशतकही करता आले नाही. शिवाय गेल्या तीन सामन्यांत त्याला दोन आकडी धावसंख्याही करणेही जमलेले नाही.

### मुंबईची बाजू

- कॅमेरून ग्रीन, सूर्यकुमार यादव आणि टिम डेव्हिड यांनी आव्हानांचा यशस्वी सामना केला. या फळीत पुढे नेहल वढेराही आला. त्यानेही प्रभावी कामगिरी केली
- रोहित शर्मा, ईशान किशन ही सलामीची जोडी छाप पाडत आहे, मात्र हे सगळे फलंदाज गुजरातचा गोलंदाजीतील आधारस्तंभ मोहम्मद शमीला कसे 'तोंड' देतात ते सामन्याच्या निकालावर परिणाम करू शकते
- याआधीच्या आयपीएल मोसमांमध्येही स्पर्धेच्या उत्तरार्धात मुंबईची कामगिरी उंचावल्याचे दिसले आहे
- आकाश मढवालचे कोडकौतुक करताना बुजूर्ग स्पिनर पीयूष चावलाचे १५ सामन्यांतील २१ विकेटच्या योगदानाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मुंबईचा पाय खोलात होता तेव्हापासून चावला योगदान देतो आहे

---

# आयपीएल २०२३: मुंबईचे अंतिम फेरीचे ध्येय!

## 'क्वालिफायर-2'च्या लढतीत आज, गुजरात टायटन्सचे आव्हान

। अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल 'क्वालिफायर-१'च्या सामन्यात गुजरातला चेन्नई सुपर किंग्जकडून पराभव पत्करावा लागला. मात्र, साखळी फेरीअंती गुणतालिकेत अग्रस्थानी राहिल्यामुळे गुजरातला अंतिम फेरी गाठण्याची आणखी एक संधी मिळणार आहे.**



गुजरात टायटन्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुवर मिळवलेल्या विजयामुळे मुंबई इंडियन्सला 'प्ले-ऑफ'मध्ये प्रवेश मिळाला होता. मात्र, इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटची अंतिम फेरी गाठण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी मुंबईला आता त्याच गुजरात संघाचे आव्हान परतवावे लागेल. पाच वेळचे विजेते मुंबई आणि गतविजेते गुजरात या संघांमधील 'क्वालिफायर-२'चा सामना आज, शुक्रवारी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. 'क्वालिफायर-१'च्या सामन्यात गुजरातला चेन्नई सुपर किंग्जकडून पराभव पत्करावा लागला. मात्र, साखळी फेरीअंती गुणतालिकेत अग्रस्थानी राहिल्यामुळे गुजरातला अंतिम फेरी गाठण्याची आणखी एक संधी मिळणार आहे. दुसरीकडे, बुधवारी झालेल्या 'एलिमिनेटर'च्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सचा ८१ धावांनी धुव्वा उडवल्यामुळे मुंबईचा संघ 'क्वालिफायर-२'च्या सामन्यासाठी पात्र ठरला आहे. त्यामुळे मुंबईचा आत्मविश्वास दुणावला असून त्यांना रोखण्यासाठी गुजरातला सर्वोत्तम खेळ करावा लागेल.

लखनऊवरील मुंबईच्या विजयात नवोदित वेगवान गोलंदाज आकाश मढवालने प्रमुख भूमिका बजावली. मढवालने पाच धावांत पाच गडी बाद करत लखनऊच्या डावाला खिंडार पाडले. त्याने त्याआधीच्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादविरुद्धही चार बळी मिळवले होते. आता त्याच्यासमोर शुभमन गिलला रोखण्याचे आव्हान असेल. या सामन्यात कर्णधार रोहित शर्मा आणि वेगवान गोलंदाज आकाश मढवाल या मुंबईच्या खेळाडूंवर दोन भिन्न कारणांसाठी सर्वांची नजर असेल.

# विक्रमादित्य विराट! मेस्सी, रोनाल्डोच्या यादीत सामील होणारा ठरला पहिला आशियाई खेळाडू



। चेन्नई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

टीम इंडियाचा अनुभवी फलंदाज विराट कोहली मैदानासोबतच सोशल मीडियावरही वर्चस्व गाजवत आहे. विराट कोहलीने क्रिकेटच्या मैदानावर अनेक पराक्रम केले आहेत. तो एक ना एक मोठा विक्रम आपल्या नावावर करत राहतो. पुन्हा एकदा विराट कोहलीने विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे, मात्र यावेळी त्याने मैदानावर नाही तर सोशल मीडियावर हा पराक्रम केला आहे.

टीम इंडियाचा स्टार फलंदाज आणि भारताची शान असणारा माजी कर्णधार विराट कोहलीच्या नावावर आणखी एका विक्रमाची नोंद झाली आहे. विराट कोहली इंस्टाग्रामवर २५० दशलक्ष फॉलोअर्स पार करणारा पहिला आशियाई व्यक्ती बनला आहे.

एवढच नाही तर जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आणि ख्रिस्तियानो रोनाल्डोनंतर असा विक्रम करणारा किंग कोहली तिसरा खेळाडू आहे. विराट कोहलीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. कोहलीचे भारतातच नाही तर, जगभरात असंख्य चाहते आहेत.